# ३. पारदर्शक परीक्षा पद्धती

शिक्षण संस्था ह्या समाजाचा केंद्रबिंदू असतात, इथेच विद्यार्थी घडत असतो पर्यायांनी समाज घडत जातो. काळाची पावलं ओळखून बदल करणे हे गरजेचे असते.यानुसार डहाणू तालुक्यातील **चिंचणी - तारापूर शिक्षण संस्था** शिक्षणाच्या क्षेत्रामध्ये अमूलाग्र बदल घडवून आणण्यासाठी प्रयत्नशील आहे. यातूनच संस्थेने महत्त्वाचे काही कार्य हाती घेतले आहे. विद्यार्थ्यांना देशाचा उत्तम नागरिक घडवत असताना काही सामाजिक बदल हे गरजेचे असतात . ते बदल घडवण्यासाठी काही विषय निर्धारित करून त्याची अंमलबजावणी संस्थेमधून केली जात आहे. अशा निर्धारित १० विषयांनाच 'CTES TOP - 10' म्हणून संबोधले आहे. विद्यार्थ्यांमध्ये चांगले बदल घडवून विद्यार्थ्यांकडून चांगला समाज निर्माण करण्याचा प्रयत्न आहे.



देशाचे उत्तम भवितव्य घडवण्यासाठी ज्या सामाजिक घटकांकडून प्रयत्न केले जातात, अशा सर्व सामाजिक घटकांना याविषयीची माहिती असणे आवश्यक आहे. जेणेकरून ते याचा विचार करतील व प्रत्यक्ष अंमलबजावणी करतील. उदा. विद्यार्थी, पालक, शिक्षक, प्रतिष्ठित व्यक्ती, परिसरातील कार्यकर्ते, कार्यरत संस्था,

शासकीय - निमशासकीय कार्यालये, इ. अशा महत्त्वपूर्ण विषयातील एक विषय म्हणजे 'पारदर्शक परीक्षा पद्धती' होय.

शिक्षण क्षेत्रामध्ये अभ्यासक्रम, अध्यापन पद्धती, अध्ययन प्रक्रिया व मूल्यमापन प्रक्रिया या घटकांना अतिशय महत्त्वाचे स्थान आहे. यामध्ये अध्यापकाची भूमिका महत्त्वपूर्ण आहे. अतिशय जबाबदारीने अभ्यासक्रम पूर्ण करणे व विद्यार्थ्यांना अध्ययन सोपे जाईल यासाठी प्रयत्न करणे, तसेच योग्य पद्धतीने मूल्यमापन करणे गरजेचे असते. आज शिक्षण क्षेत्रामध्ये परीक्षा आहे मूल्यमापनाचे महत्त्वाचे साधन आहे त्यामुळे शिक्षक - पालक - विद्यार्थी सर्वांचेच लक्ष हे लेखी परीक्षेकडे लागलेले असते. म्हणून योग्य मूल्यमापनासाठी सध्या अस्तित्वात असलेल्या परीक्षा पद्धतीपेक्षा पारदर्शक परीक्षा पद्धती अधिक महत्त्वपूर्ण ठरते.

चिंचणी तारापूर शिक्षण संस्थेमध्ये सन २००२ पासून 'पारदर्शक परीक्षा पद्धती' चा अवलंब केला जात आहे. विद्यार्थ्यांमध्ये प्रामाणिकपणाची व अभ्यासू वृत्तीची वाढ करणे, विद्यार्थ्यांचे नि:पक्षपाती मूल्यमापन करणे व शिक्षण क्षेत्रातील भ्रष्टाचार थांबवणे या हेतूने संस्थेचे चेअरमन माननीय श्री. रजनीकांत पुरुषोत्तम श्रॉफ यांनी पारदर्शक परीक्षा पद्धतीची रचना केली. प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक स्तरावर या परीक्षा पद्धतीचा अवलंब संस्थेच्या विविध शाखेत केला जात आहे. कन्येला १२ वी बोर्डाच्या परीक्षेमध्ये परीक्षागृहात आलेल्या अडचणीमुळे सरांना विद्यार्थ्यांनात्रासदायक ठरणाऱ्या

परीक्षागृहातील अयोग्य वातावरणा संबंधीची समस्या लक्षात आली. त्यावर मात करण्याच्या उद्देशाने केलेल्या प्रयत्नातून पारदर्शक परीक्षा पद्धतीचा जन्म झाला. जाणून घेऊया 'पारदर्शक परीक्षा पद्धती' विषयी महत्त्वाची माहिती.

**१. व्याख्या** –

१. शिक्षण क्षेत्रातील अयोग्यता दूर करून, शिक्षण क्षेत्राचे पावित्र्य राखण्यासाठी विद्यार्थ्यांचे पारदर्शकपणे मूल्यमापन करणारी परीक्षा पद्धती म्हणजे 'पारदर्शक परीक्षा पद्धती' होय. '

१.२ - ' ज्ञानसंपादनाची प्रेरणा व स्वयं मूल्यमापनाची संधी असा सकारात्मक दृष्टिकोन पालक व विद्यार्थ्यांमध्ये निर्माण होण्यासाठी राबविले जाणारी परीक्षा पद्धती म्हणजे 'पारदर्शक परीक्षा पद्धती' होय.

**२. उद्दिष्टे -**

विद्यार्थ्यांच्या प्रगतीचे योग्य मूल्यमापन करणे. पेपर फुटीच्या भ्रष्टाचार प्रकारास प्रतिबंध करणे. शिक्षण प्रक्रियेतील घटकांचा सहभाग व समन्वय साधणे. अध्ययन-अध्यापनाचे महत्त्व टिकून ठेवणे. शिक्षणा विषयी सामाजिक जागृती निर्माण करणे.

**३. परीक्षा प्रक्रियेतील पुढील प्रकारच्या भ्रष्टाचारास आळा घालणे** :

प्रश्नपत्रिका काढणे ते छपाई पर्यंत च्या प्रक्रियेत होणारा भ्रष्टाचार, परीक्षागृहातील विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्याकडून होणारा भ्रष्टाचार, उत्तर पत्रिका तपासणाऱ्या व निकाल लावणाऱ्या व्यक्तीकडून होणारा भ्रष्टाचार.

**४. गृहीतके** :

अभ्यासक्रम योग्य पद्धतीने पूर्ण केलेला असावा. 'परीक्षेसाठी अभ्यास' ही शिकवण नसावी. शिक्षणाची उद्दिष्टे साध्य करण्याचा प्रयत्न असावा. अध्यापकांनी ज्यादा मेहनत घेणे अपेक्षित आहे. संबंधित सर्व घटकांना पारदर्शक परीक्षा पद्धतीची संपूर्ण माहिती दिलेली असावी, प्रतिष्ठित ज्येष्ठ नागरिकांना मानाने निमंत्रित करणे. प्रश्नपत्रिकाचे योग्य काठिण्य पातळीचे उत्तरासहित तीन संच बनविणे.

**५.- पारदर्शक परीक्षा पद्धतीच्या अंमलबजावणीचे टप्पे -**

**५.१ - संबंधित सर्व घटकांना माहिती देणे.**

**५.१.१ - विद्यार्थ्यांना माहिती देणे** –

परीक्षेच्या वेळी परीक्षा गृहात शिक्षक पर्यवेक्षकांसोबत ज्येष्ठ नागरिक उपस्थित असतील. विद्यार्थ्यांसाठी प्रश्नपत्रिकांचे A.B.C.असे तीन संच असतील.  पुढच्या व मागच्या विद्यार्थ्यांची प्रश्नपत्रिका वेगळी असेल. विद्यार्थ्यांनी परस्पर आपसात संच बदलणे नकल (कॉपी) समजली जाईल, प्रत्येक विद्यार्थाला दिलेला संच सोडवणे बंधनकारक असेल. गुणानुसार निर्धारित केलेला परीक्षेच्या पूर्ण कालावधीत विद्यार्थी परीक्षा गृहात असणे आवश्यक आहे. अयोग्य प्रकाराचा अवलंब विद्यार्थ्यांनी करू नये, उदाहरणार्थ नक्कल करणे, विचारून लिहिणे, पाहून लिहिणे, इत्यादी.

**५.१.२ - पालकांना माहिती देणे –**

पाल्यांची परीक्षा ही 'पारदर्शक परीक्षा पद्धती' ने होणार आहे, या संदर्भात पालकांना सुचित करणे. पर्यवेक्षकाबरोबरच परीक्षागृहात जेष्ठ नागरिक असतील याची जाणीव देणे. परीक्षेच्या प्रश्नपत्रिकां चे सेट कसे असतील ते सांगणे. पेपर तपासून मिळाल्यानंतर स्वतः पालक उत्तर पत्रिका घेऊन पेपर कसे पुन्हा तपासून - पडताळून पाहू शकतात, त्या विषयी माहिती देणे.

**५.१.३ - ज्येष्ठ नागरिकांना माहिती देणे –**

परिसरातील ज्येष्ठ नागरिकांशी संपर्क साधून त्यांना सन्मानाने निमंत्रित करणे व माहिती देणे. जे नागरिक येऊ  इच्छितात त्यांना कशा पद्धतीने कार्य करायचे आहे, ते सांगणे. ज्येष्ठ नागरिक शिक्षण क्षेत्राशी संबंधित असतील तर उत्तम.   चेष्टा नागरिकांनी परीक्षेच्या कालावधीत दिलेल्या वेळेत उपस्थित रहावे. ज्येष्ठ नागरिकांनी तीन ते पाच जणाने एकत्र येऊन ठराविक वेळाने परीक्षागृहाबाहेरून फेरी मारावी व परीक्षागृहातील स्थिती पहावी. ज्येष्ठ नागरिकांसोबत संस्थेतील कार्यरत व्यक्ती पदाधिकारी असतील. गरजेनुसार परीक्षागृहात पर्यवेक्षकांसोबत त्यांना थांबावे लागेल. परीक्षागृहात अयोग्य गोष्ट आढळल्यास सोबतच्या संस्थेत कार्यरत व्यक्तीला किंवा  पर्यवेक्षकास निदर्शनास आणून द्यावे. ते योग्य कारवाई करतील. गरज भासल्यास परीक्षेच्या वेळेनंतर शिक्षक व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करू शकतात. परीक्षा चालू असताना विद्यार्थ्यांशी, पर्यवेक्षकांशी गरजे शिवाय बोलू नये. ज्येष्ठ नागरिकांना त्यांच्या उपस्थितीचे महत्त्व पटवून देणे.

**५.२- प्रश्नपत्रिका तयार करणे -**

प्रश्नपत्रिका तयार करताना विशेष काळजी घेण्याची गरज शिक्षकांना पाटवून देणे. ठरवलेल्या अभ्यासक्रमावर आधारित संविधान तक्त्यानुसार विषय प्रमुखाच्या मार्गदर्शनाखाली तीन प्रश्नपत्रिका तयार करणे. तिन्ही प्रश्नपत्रिकांचे स्वरूप सारखे असावे. त्यास A,B,C संच म्हणून संबोधावे. प्रत्येक संचामध्ये घटकावर ठरवून दिलेले गुण तसेच ज्ञान, आकलन व उपयोजना वरील गुण सारखे असावे. प्रश्न पत्रिकेची काठीण्य पातळीसारखी असावी. एका प्रश्नपत्रिकेतील प्रश्न दुसऱ्या प्रश्नपत्रिकेत पुन्हा येणार नाही याची काळजी घ्यावी. जर एकच प्रश्न टाकणे गरजेचे वाटले तर प्रश्नाची वाक्य रचना बदलून टाकावा.

**५.३ - नमुना उत्तर पत्रिका तयार करणे** –

प्रश्नपत्रिकेनुसार क्रमवार उत्तरांची नोंद घेत, नमुना उत्तर पत्रिका तयार करावी. त्यात अपेक्षित उत्तरांचे सर्व मुद्दे नोंद करावे. लक्षात ठेवावे पालकांनी मागणी केल्यास नमुना उत्तर पत्रिकेतील उत्तरानुसार विद्यार्थ्यांच्या उत्तर पत्रिकेची पुन्हा तपासणी होणार आहे. वस्तुनिष्ठ प्रश्नांची उत्तरे सोडता इतर सर्व प्रश्नांची उत्तरे मुद्द्यानुसार लिहावी. किती मुद्दे असल्यास किती गुण दिले जातील याचा स्पष्ट उल्लेख करावा. उत्तर पत्रिका तपासताना याच उत्तर पत्रिकेचा आधार घ्यावा.

**५.४- प्रत्यक्ष परीक्षागृहात परीक्षा घेणे -**

**५.४.१ पेपरच्या अर्धा तास आधी** :

शिक्षक पर्यवेक्षक व ज्येष्ठ नागरिक पर्यवेक्षक नेमावे ज्येष्ठ नागरिकांना सन्मानाने निमंत्रित करावे प्रश्नपत्रिकांचे व उत्तर

पत्रिकांचे गठ्ठे लावणे. प्रश्नपत्रिकांचा क्रम ठरविणे. विद्यार्थ्यांसाठी प्रश्नपत्रिका सेट कोणता असेल ते वेळेवर निश्चित करणे.

### ५.४.२ - प्रश्नपत्रिकांचे वाटप करताना –

प्रश्नपत्रिकांचे वाटप A, B, C सेट प्रमाणे करण्यात यावे. बैठक व्यवस्था ही परीक्षा नंबर प्रमाणे केलेली असेल, सेट वाटप करत असताना पुढील व मागील विद्यार्थ्यांचे सेट वेगळे असतील याची काळजी घ्यावी. निश्चित केल्या प्रमाणेच विद्यार्थ्यांना प्रश्नपत्रिका संच द्यावा. प्रश्नपत्रिका संच ठरल्याप्रमाणे आहे की नाही ते ज्येष्ठ नागरिक पर्यवेक्षकाने सुद्धा पहावे. परस्पर विद्यार्थ्यांनी संच अदलाबदल करणे नकल (कॉपी) समजले जाईल याची जाणीव विद्यार्थ्यांना सुरुवातीला द्यावी. प्रश्नपत्रिकेवरती विद्यार्थ्यांचा परीक्षा क्रमांक व उत्तरपत्रिकेवरती विद्यार्थ्यांचा प्रश्नपत्रिका सेट नोंद करण्यास सांगावे. ज्येष्ठ नागरिक व पर्यवेक्षक यांनी ते तपासून पहावे.

### ५.४.३ - पेपरच्या कालावधीत –

पेपर सुरू झाल्यानंतर विद्यार्थ्यांना परीक्षा गृहाबाहेर अडचण असल्याशिवाय सोडू नये. ज्येष्ठ नागरिकांनी त्यांना दिलेल्या माहितीनुसार वागावे, शक्यतो एका कोपऱ्यामध्ये खुर्चीवर बसावे. अयोग्य प्रकार आढळून आल्यास शिक्षक पर्यवेक्षकांच्या निदर्शनास आणून देणे, ते योग्य ते कारवाई करतील.

### ५.४.४ - उत्तर पत्रिका जमा करताना –


पेपरचा कालावधी संपल्यानंतर उत्तरपत्रिका विद्यार्थ्यांच्या परीक्षा क्रमांकानुसार जमा कराव्या. सर्व विद्यार्थ्यांच्या उत्तर

पत्रिका जमा केल्याशिवाय विद्यार्थी वर्गाबाहेर पडणार नाही याची काळजी घ्यावी. त्यानंतर संपूर्ण वर्गाच्या उत्तर पत्रिकांच्या गठ्ठा एकत्र झाला की अनुपस्थित नंबर नोंद करून घ्यावे. मग प्रश्नपत्रिकांच्या सेट नुसार उत्तरपत्रिकांची विभागणी करावी.

**५.५ - उत्तर पत्रिकांचे परीक्षण (उत्तर पत्रिका तपासणे) –**

पारदर्शक परीक्षा पद्धतीमध्ये उत्तरपत्रिकांचे परीक्षण ही महत्त्वाची जबाबदारी आहे. शासन नियमाप्रमाणे तयार केलेल्या नमुना उत्तर पत्रिके नुसार नियमकानी काळजीपूर्वक उत्तर पत्रिका तपासाव्या. विद्यालय अंतर्गत परीक्षा असल्यास उत्तर पत्रिका तपासल्यानंतर जर विद्यार्थी किंवा पालकांना प्राप्त गुण समाधानकारक वाटले नाही, त्यात त्यांना वशिलेबाजी किंवा जाणून कमी गुण दिले आहेत असे वाटत आल्यास, त्या संदर्भात पालकांनी कार्यालयास कळविले किंवा पालकाला आपल्या पाल्याच्या उत्तरपत्रिकेची पाहणी करायची असल्यास, त्यांनी नमुना उत्तर पत्रिका मागितल्यास, उत्तर पत्रिकेचे पुन्हा नियमन करावे. त्यानंतर पालकांना नमुना उत्तर पत्रिका देण्यात यावी. या नमुना उत्तर पत्रिकेवरून पालकांना पाल्याची उत्तर पत्रिका कशी तपासून पहावी या संदर्भात शिक्षकांनी मार्गदर्शन करावे. पालकांचे व विद्यार्थ्यांचे योग्य समाधान होणे ही बाब महत्त्वाची आहे. आपल्या पाल्यावर अन्याय झालेला नाही अशी पालकांची खात्री होईपर्यंत त्यांना मार्गदर्शन करावे.

**६ - पारदर्शक परीक्षा पद्धतीचे फायदे -**



पारदर्शक परीक्षा पद्धत-एका विषयाचे तीन सेट (ABC)

शिस्तीच्या वातावरणात परीक्षा घेता येते. विद्यार्थ्यांचे मूल्यमापन योग्य पद्धतीने होते. विद्यार्थ्यांवर अन्याय होत नाही. परीक्षागृहामध्ये शिस्तीचे वातावरण तयार होते. नकल (कॉपी) करण्यास आळा बसतो. दोन पर्यवेक्षक असल्याने विद्यार्थी कॉपी करू शकत नाही. एकाग्रतेने पेपर लिहिता येतो. पेपर फुटीच्या गैर मार्गापासून मुक्ती मिळते. ज्येष्ठ नागरिकांना सहभागी करून त्यांचा सन्मान करता येतो, त्यांना यातून समाधान व आनंद मिळतो. स्वयंअध्ययनाचा पर्याय विद्यार्थ्यांना निवडावा लागतो. व त्यांची परीक्षांविषयीची भीती कमी होते. मनोबल वाढते परीक्षेतील यशाबाबत विश्वास वाढतो. विद्यार्थी समर्थ व सक्षम बनतात. विद्यार्थ्यांना नैतिक मूल्याचे शिक्षण मिळते.

**७ - घ्यावयाची काळजी किंवा मर्यादा –**

विद्यार्थी पालक ज्येष्ठ नागरिक व शिक्षक पर्यवेक्षक यांना दिलेला सूचनांचे तंतोतंत पालन होणे आवश्यक आहे. पेपर काढताना सांगितलेले नियम योग्य पद्धतीने पाळलेले असावे. ज्येष्ठ नागरिकांना मानाने वागवावे. पर्यवेक्षकांची व ज्येष्ठ नागरिकांची नियुक्ती परीक्षागृहात वेळेवरतीच करावी.

प्रश्नपत्रिकाचे सेट उत्तर पत्रिकेवर लिहिणे विद्यार्थ्यांना अनिवार्य असावे. अभ्यासक्रम योग्य पद्धतीने पूर्ण केलेला असावा.

**८ - त्रृट व त्याचे समाधान** –

सर्व विद्यार्थ्यांना एकच प्रश्नपत्रिका नाही ही त्रृट आढळते. मात्र प्रश्नपत्रिका काढताना सांगितलेले नियम योग्य पद्धतीने पाळल्यास,काठिण्य पातळी सारखी राखल्यास विद्यार्थ्यांना न्याय मिळू शकतो. त्यामुळे एका त्रुटी साठी चांगली गोष्ट त्यागावी हे योग्य नाही. पारदर्शक परीक्षा पद्धत जर लागू केली तर त्याचे फायदे भरपूर आहेत, म्हणून या पद्धतीचा स्वीकार करणे व प्रसार करणे आवश्यक आहे.

**९ - संस्थेचे प्रयत्न –**

**९.१ -** चिंचणी तारापूर प्रशिक्षण संस्थेच्या सर्व शाखेतील शिक्षकांची सभा घेऊन संस्थेचे चलन माननीय रजनीकांतभाई श्रॉफ यांनी पारदर्शक परीक्षा पद्धतीचे व्यवस्थित स्पष्टीकरण केले.

**९.२** - चिंचणी तारापूर प्रशिक्षण संस्थेमध्ये सन २००२ पासून पारदर्शक परीक्षा पद्धतीचा अवलंब केला जात आहे. प्रश्नपत्रिकांचे तीन संच काढले जात आहेत. या अभिनव प्रयोगाचे मुंबई विद्यापीठाच्या माजी कुलगुरू मा. डॉ. स्नेहलता देशमुख यांनीही कौतुक केले.

**९.३-** मोतीलाल कानजी कनिष्ठ महाविद्यालय चिंचणी, या संस्थेच्या शाखेतून प्रकाशित होणारे नियतकालिक 'सागरमोती'

यामध्ये प्रा. रूचिरा राऊत, माजी पर्यवेक्षक श्री. संजय घरात, प्रा. मेघा पाटील, पर्यवेक्षक श्री. दिनकर टेकनर यांनी 'पारदर्शक परीक्षा पद्धती' वरती लेखन केले आहे.

**९.४ -** S.S.C.व H.S.C. बोर्डाच्या परीक्षेसाठी जेव्हा प्रश्नपत्रिका संच पद्धतीचा (A,B,C,D) अवलंब केला तेव्हा चिंचणी तारापूर शिक्षण संस्थेचे चेअरमन साहेब रजनीकांतभाई श्रॉफ, सदस्या डॉ. रामिलाबेन श्रॉफ, मॅनेजमेंट कन्सल्टंट पाहणारे श्री. पी. एस. राव, एम. के. ज्युनिअर कॉलेजचे माजी उपप्राचार्य श्री. जे. बी. शिंदे, पत्रकार विनोद मराठे या पाच जणांना चर्चेसाठी प्राचारण केले गेले होते.

**९.५** - महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे, वरिष्ठ वेतन श्रेणी प्रशिक्षण पूर्ततेसाठी प्रा.प्रिती राऊत व प्रा. मेघा पाटील यांनी 'पारदर्शक परीक्षा पद्धती' या विषयावरती शोधनिबंध सादर केले.



पालक, शिक्षक, ज्येष्ठ नागरिक, संस्थाचालक यांना 'पारदर्शक परीक्षा पद्धती' अवलंबण्यासाठी अधिक कष्ट घ्यावे लागत आहेत,परंतु या कामातून सर्वांना चांगले काम केल्याचे समाधान व आनंद मिळत आहे. शिक्षण क्षेत्राशी संबंधित सर्व व्यक्तींचे ध्येय 'विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास' हे असते, त्यावर लक्ष केंद्रित कराल तितके

पारदर्शक परीक्षा पद्धतीचे अधिक समर्थन कराल, असा विश्वास आहे.

**प्रा. प्रीती राऊत व प्रा. मेघा पाटील**
**एम. के. ज्युनिअर कॉलेज, चिंचणी**